आपली सेवा आमचे कर्तव्य

अपर आयुक्त
आदिवासी विकास , अमरावती पोलीस मुख्यालयासमोर , टी.बी.हॉस्पीटलमागे,
कॅंप, अमरावती दुरध्वनी क्र.:- 0721 – 2553966 ई - मेल :- atc.amr-mh@gov.in

महाराष्ट्र शासन

जा.क्र./-२०२०/प्र.क्र./का-२(इ)/2543/२०२१ दिनांक - ०७ / ०६ / २०२१

प्रति,
**उपसंचालक**
माहीती व जनसंपर्क प्रसिध्दी विभाग,
अमरावती / औरंगाबाद

**विषय** - अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणेबाबत. (सन- 2021-22)

**संदर्भ** - मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे पत्र क्रमांक - प्रशिशि-2021/प्र.क्र.09/का-6(6)/ दिनांक - 4.6.2021

वरील विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेता यावे व त्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना विभागाने दिनांक - 31 मार्च 2005 चे शासन निर्णयानुसार आयुक्तालय आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य नाशिक स्तरावर राबविण्यात येत आहे. सदर योजनेसाठी शासन निर्णय दिनांक - 16 मार्च 2016 नुसार प्रस्तुत योजनेचा लाभ मिळणेसाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न कमाल मर्यादा रुपये 6.00 लाखपर्यंत वाढविण्यात आली आहे.

सन 2021-22 या वर्षात सदर योजनेचा लाभ मिळणेकरीता जास्तीत जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांकडुन अर्ज प्राप्त होणेकरीता योजनेची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्याच्या शासनस्तरावरुन सुचना आहेत. तरी यासोबत जोडलेली प्रेसनोट वृत्तपत्रात दिनांक - 09.06.2021 च्या आत विनामुल्य प्रसिध्द करावी ही विनंती.

**सहपत्र** - प्रसेनोट

7/6/21
(विनोद पाटील)
अपर आयुक्त
आदिवासी विकास अमरावती.

**प्रत,**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी / पांढरकवडा / किनवट / अकोला / पुसद / कळमनुरी / औरंगाबाद आपणांस कळविण्यात येते की, आपले स्तरावरील सदर योजनेसंबधी वृत्तपत्रात विनामुल्य बातमी प्रसिध्द करावी. तसेच सदरु शिष्यवृत्ती योजनेची माहीती अधिनस्त असलेल्या एकलव्य रेसिडेंशियल स्कुल व शासकीय आश्रम शाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात यावी. सदर योजनेचा लाभ मिळणेसाठी आपले कार्यालयाकडे विद्यार्थ्यांकडुन प्राप्त अर्ज दिनांक - 25 जुन 2021 पर्यंत या कार्यालयास सादर करावेत.

अपर आयुक्त
आदिवासी विकास अमरावती.

Scanned with CamScanner

# प्रेसनोट

महाराष्ट्र शासनाचे आदिवासी विकास विभागाकडुन शासन निर्णय क्र आदिशी-1203/प्र.क्र.76/का-12 दिनांक - 31 मार्च 2005 व दिनांक - मार्च 2016 अन्वये राज्यातील अनुसुचित जमातीच्या 10 विद्यार्थ्यांना परदेशात पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणेसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडुन शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

विहीत नमुन्यातील अर्ज, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी , पांढरकवडा, किनवट, अकोला,पुसद,कळमनुरी,औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. दिनांक - 30.06.2021 पर्यंत विहीत नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरुन कार्यालय प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी,पांढरकवडा,किनवट, अकोला,पुसद, कळमनुरी,औरंगाबाद येथे सादर करावे,

(टिप - अर्ज करण्याकरीता आवश्यक असलेली पात्रता अटी व शर्ती अपर आयुक्त कार्यालय अमरावती व प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयातील सुचना फलकावर आपणांस उपलब्ध आहे. )

(विनोद पाटील)
अपर आयुक्त
आदिवासी विकास अमरावती.

Scanned with CamScanner

आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, नाशिक
आदिवासी विकास भवन,पहिला मजला, गडकरी चौक, जुना मुंबई-आग्रा रोड, नाशिक -४२२००२
दुरध्वनी क्रमांक (०२५३)२५७७५१० २५७४२३५, २५७५६१५, २३१७९३८, फॅक्स -२५७९२०८
e-mail- ctdnsk@yahoo.com

---

**अत्यंत महत्वाचे**

क्र. पशिशि-२०२१/प्र.क्र.०९/का.६(६)
दिनांक : मे, २०२१

प्रति,
अपर आयुक्त,
आदिवासी विकास,
नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर

प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (सर्व)

---

**विषय :- अनुसूचित जमातीच्या मुला- मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणेबाबत...**
**( सन २०२१-२२ )**
**संदर्भ :- शासन पत्र क्र. पशिशि-२०२१/ प्र. क्र. ५७/ का १२/ दिनांक २१/०५/२०२१**

वरील विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेता यावे व त्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना विभागाचे दिनांक ३१ मार्च, २००५ चे शासन निर्णयानुसार आयुक्तालय स्तरावर राबविण्यात येत आहे. तसेच दिनांक १६ मार्च, २०१६ चे शासन निर्णयान्वये प्रस्तुत योजनेचा लाभ मिळणेसाठी **विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षीक उत्पन्न कमाल मर्यादा रु.६.०० लाख पर्यत वाढविणेत आली आहे.**

२. सदर योजनेचा लाभ मिळणेकरीता जास्तीत जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांकडून अर्ज या कार्यालयाकडे प्राप्त होणेकरीता या कार्यालयाकडून प्रसार माध्यमाद्वारे राज्यस्तरावर दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द केली जात आहे. परंतू त्याद्वारे विद्यार्थ्यांकडून पुरेशा प्रमाणात अर्ज या कार्यालयाकडे प्राप्त होत नाहीत. गतवर्षात आपणास यासबंधी वेळोवेळी सुचना देऊन अर्ज सादर करणेविषयी कळविले असता आपणाकडून त्यास काहीच प्रतिसाद मिळाला नाही. तरी आता सन २०२१-२२ या वर्षात आपणाकडुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्राप्त होणे अपेक्षीत आहे. त्यादृष्टीने योजनेची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी करण्याकरीता अपर आयुक्त व प्रकल्प कार्यालय स्तरावर योजनेसबंधी वृत्तपत्रात विनामुल्य बातमी प्रसिध्द करावी. तसेच जाहिरात प्रसिध्द करतांना महाविद्यालय, विद्यापीठ प्रवेश, अभियांत्रीकी तसेच वैद्यकीय प्रवेशाच्या प्रास्पेक्टस मध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता परदेश शिक्षण शिष्यवृत्तीचा उल्लेख करण्यात यावा. तसेच सदरहू शिष्यवृत्ती योजनेची माहिती अधिनस्त एकलव्य रेसिडेंसियल स्कुल व शासकीय आश्रमशाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात तसेच इतर शाळा, महाविद्यालय येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात यावी. तसेच योजनेची ऑनलाईन व ऑफलाईन व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी. जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊन परदेशात शिक्षण घेऊ शकतील.

३. वरीलप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करुन सदर योजनेचा लाभ मिळणेसाठी आपले कार्यालयाकडे विद्यार्थ्यांकडून प्राप्त **अर्ज दिनांक ३० जुन, २०२१ पर्यत** या कार्यालयाकडे सादर करावेत.

सोबत-आवेदन पत्र

(विकास पानसरे)
अपर आयुक्त (मुख्यालय)
आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, नाशिक.

स्थळप्रतीवर मा. आयुक्त, महोदय यांची स्वाक्षरी असे.

प्रतिलिपी :- मा.सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

Scanned with CamScanner

**आदिवासी विकास विभाग**

**आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक**

आदिवासी विकास भवन, पहीला मजला, जुना मुंबई आग्रा रोड, गडकरी चौक, नाशिक ४२२२०२

---

## अनुसूचित जमातीच्या मुला/मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना.

महाराष्ट्र शासनाचे आदिवासी विकास विभागाकडून शासन निर्णय क्र.आदिशी-१२०३/प्र.क्र.७६/ का. १२, दिनांक ३१ मार्च, २००५, ११ एप्रिल, २०१२ व दिनांक १६ मार्च, २०१६ अन्वये राज्यातील अनुसूचित जमातीच्या १० विद्यार्थ्यांना परदेशात पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणेसाठी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात परदेशात खालील अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणेसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे निकष आहेत.

१. राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना विदेशी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी अनुसूचित जमातीच्या एकूण १० विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी/अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती देण्यात येईल. तथापि, दहा विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले तर अशा विद्यार्थ्यांना त्यांनी इयत्ता १२ वी व पदवी अभ्यासक्रमात मिळविलेल्या गुणाआधारे प्राधान्य देण्यात येईल.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | स्तर | पदवी | पदव्युत्तर | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | एम.बी.ए. | पदव्युत्तर | ० | २ | २ |
| २. | वैद्यकीय अभ्यासक्रम | पदवी / पदव्युत्तर | १ | १ | २ |
| ३. | बी. टेक (इंजिनिअरींग) | पदवी / पदव्युत्तर | १ | १ | २ |
| ४. | विज्ञान | पदवी / पदव्युत्तर | ० | १ | १ |
| ५. | कृषी | पदवी / पदव्युत्तर | ० | १ | १ |
| ६. | इतर विषयाचे अभ्यासक्रम | पदवी / पदव्युत्तर | ० | २ | २ |
| | एकूण | | २ | ८ | १० |

2. सदर शिष्यवृत्ती वर नमूद केलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी त्यासमोर नमूद केलेल्या संख्येच्या प्रमाणात मंजूर करण्यात येईल. शिष्यवृत्तीसाठी वरीलप्रमाणे संख्या निश्चित केली असली तरी पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल. तथापि, असे उमेदवार ज्यावेळी उपलब्ध होणार नाहीत त्यावेळी पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. त्याचप्रमाणे वर नमूद केल्याप्रमाणे शिष्यवृत्तीस निश्चित केलेली संख्या/क्षमता एका अभ्यासक्रमाकडून दुस-या अभ्यासक्रमासाठी वापरली जाईल.
3. उमेदवाराची निवड करतांना भुमिहिन आदिवासी कुटूंबातील विद्यार्थी, दुर्गम भागातील विद्यार्थी, तसेच आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यास या शिष्यवृत्तीसाठी प्राधान्य देण्यात येईल.
4. विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असल्यासबंधी अधिवास प्रमाणपत्र (नॅशनॅलीटी व डोमोसिअल सर्टीफिकेट ) सादर करणे आवश्यक आहे.
5. विद्यार्थी महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीचा असावा. त्याबाबत सक्षम प्राधिका-यांकडून जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र विद्यार्थ्याने अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
6. या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याचे वय दिनांक १.६.२०२१ रोजी जास्तीत जास्त 35 वर्षापर्यत असावे. तथापि,नोकरी करीत असलेल्या विद्यार्थ्याचे बाबतीत उच्च वयोमर्यादा ही ४० वर्षापर्यत राहील. परंतू नोकरीत नसलेल्या विद्यार्थ्यास निवडीचे वेळी प्राधान्य देण्यात येईल.
7. विद्यार्थ्यास परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठात प्रथम वर्षाकरीता प्रवेश मिळालेला असावा.
8. शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणा-या विद्यार्थ्याच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न कमाल मर्यादा जास्तीत जास्त रुपये 6,00,000/- पर्यत राहील. त्यासबंधी सक्षम अधिका-यांचे वार्षीक उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
9. विद्यार्थ्याने कोणत्या दिनांकास व कोणत्या विमानाने परदेशात जाणार आहे याची माहिती आयुक्तालयास दिल्याशिवाय त्याला परदेशात जाता येणार नाही.
10. सदर शिष्यवृत्ती आदिवासी कुटूंबातील केवळ एकच व्यक्तीस (मुलगा/मुलगी) आणि एकच अभ्यासक्रमास अनुज्ञेय राहील.
11. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याने निवडलेला अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास, अभ्यासक्रमासाठी शासनामार्फत खर्च करण्यात आलेली संपुर्ण रक्कम त्याचेकडून वसुल करणेत येईल. तसेच सदर अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर भारतात परत येणे किंवा किमान पाच वर्ष भारतात सेवा करणे बंधनकारक राहील. या अटी मान्य असल्यासबंधी विद्यार्थ्याने लेखी हमीपत्र (बॉन्ड) दोन जामीनदारांसह सादर करावे लागेल.

Scanned with CamScanner

12. परदेशात अभ्यासक्रमासाठी एकदा निश्चित केलेला कालावधी वाढवता येणार नाही. अथवा शिष्यवृत्तीस मंजूरी घेतेवेळी जो अभ्यासक्रम निवडला आहे त्यात बदल करता येणार नाही. विद्यार्थ्याने निवडलेला अभ्यासक्रम व त्याचा कालावधी अर्जात स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.
13. अभ्यासक्रम संपल्यावर सबंधित विद्यार्थ्यांने त्वरीत भारतात येऊन त्याचे अंतिम परिक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र आयुक्त, आदिवासी विकास यांना सादर करणे आवश्यक राहील. याशिवाय सध्या करीत असलेल्या व्यवसायाची माहिती दयावी.
14. नोकरीत असलेल्या विद्यार्थ्यास या शिष्यवृत्तीसाठी सादर करावयाचा अर्ज त्याच्या नियोक्त्यामार्फत सादर करणे बंधनकारक राहील.
15. परदेशात ज्या विद्यापीठात विद्यार्थ्यास प्रवेश मिळाला आहे. त्या विद्यापीठास व संस्थेस ऑनलाईन प्रणालीनुसार डायरेक्ट खात्यावर ट्युशन फी जमा करण्यात येईल. तथापि विद्यार्थ्यासाठी निर्वाहभत्ता त्याचे खात्यावर जमा करण्यात येईल.
16. शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यास, परदेशातील निवास हा अभ्यासक्रमाचा कालावधी पलिकडे कोणत्याही परिस्थितीत वाढविता येणार नाही.
17. सबंधित विद्यार्थ्याने अगोदरच्या वर्षाचे गुणपत्रक, विद्यापीठ फी व निवास फी अदा केल्याबाबत प्रमाणित प्रत दिल्यानंतरच पुढील वर्षाची शिष्यवृत्ती आयुक्त, आदिवासी विकास हे मंजूर करतील.
18. अभ्यासक्रमाचा कालावधी संपल्यावर परदेशातील वास्तव्यासाठी कोणताही पत्रव्यवहार आयुक्तालयामार्फत केला जाणार नाही अथवा त्यासाठी कोणताही जादा निधी मंजूर केला जाणार नाही.
19. परदेशातील ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याची निवड झाली आहे त्या देशाचे पारपत्र (व्हीजा) प्राप्त करण्याची जबाबदारी सबंधीत विद्यार्थ्याची राहील. यासाठी राज्य अथवा केंद्रशासनाचे कोणतेही अर्थसहाय्य उपलब्ध होणार नाही.
20. ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी प्रवेश घेणार आहे त्याच अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास फी अनुज्ञेय राहील, इतर कोणताही अनुषंगीक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश व फी अनुज्ञेय राहणार नाही.
21. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याने अर्जासोबत चुकीची माहिती अथवा खोटे कागदपत्र सादर केल्याचे आढळून आल्यास अशा विद्यार्थ्याकडून शिष्यवृत्तीपोटी शासनाने केलेला संपूर्ण खर्च शेकडा 15 टक्के व्याजासह वसुल करण्यात येईल. तसेच सदर विद्यार्थ्याचे नांव काळया यादीत टाकण्यात येईल.
22. परदेशी विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी GRE (Graduate Record Examination) तसेच TOFEL (Test of English as a Foreign Language)/ IELTS (International English Language Testing System) या प्रवेश परिक्षा घेतल्या जातात. सदर GRE च्या आधारावर प्रवेश घेणा-या व TOFEL/ IELTS उत्तीर्ण असणा-या विद्यार्थ्यांचा विशेष विचार करण्यात येईल.
23. ज्या परदेशी विद्यापीठाचे जागतिक रँकींग (Latest QS world ranking ) 300 पर्यंत आहे अशाच विद्यापीठात प्रवेश मिळालेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र राहतील मात्र निवड मेरीटनुसार होईल
24. विद्यार्थ्यास शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक कॉन्टेजन्सी चार्जेस हे लाभ देण्यात येतील.
25. विमान प्रवास, विजा फी, स्थानिक प्रवास भत्ता, विमा, संगणक, लॅपटॉप व आयपॅड व इतर सुविधांचा खर्च विद्यार्थ्यांने स्वखर्चाने करावा लागेल.
26. नोकरीत असलेल्या विद्यार्थ्यास या शिष्यवृत्तीसाठी सादर करावयाचा अर्ज त्याच्या नियोक्त्यामार्फत सादर करणे बंधनकारक राहील.
27. परदेशात ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याची निवड झाली आहे त्या देशाचे पारपत्र (व्हीजा) व पासपोर्ट मिळविण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील. यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध होणार नाही.
28. परदेशातील विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाल्याबाबतचे त्या विद्यापीठाचे पत्र व सबंधित विद्यापीठाच्या प्रॉस्पेक्टसची प्रत
29. अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्कासह येणा-या एकुण खर्चाचे संस्थेचे प्रमाणपत्र.
30. परदेशातील ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे ,त्या अभ्यासक्रमाशी संबधित असलेल्या शाखेतील /विभागातील दोन विद्येकनिष्ठ / फॅकल्टी यांचे शिफारसपत्र (Reference)

शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणेसाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्र (अर्ज) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक, अपर आयुक्त, आदिवारी विकास नाशिक/ ठाणे/ अमरावती/ नागपूर यांचे कार्यालयात तसेच सबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामुल्य उपलब्ध आहेत.

शिष्यवृत्ती लाभ घेऊ इच्छीना-या विद्यार्थी/ विद्याथीनींनी वर नमूद कार्यालयातून विहित नमुन्यात शिष्यवृत्तीसाठी नमूना अर्ज प्राप्त करुन परिपुर्ण माहिती भरुन व त्यासोबत आवश्यक कागदपत्र प्रमाणित प्रतीसह अर्ज प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे कार्यालयामार्फत अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचेकडे दिनांक २५ जुन, २०२१ पर्यत सादर करावयाचे आहेत. अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी त्यांचेकडे प्राप्त अर्ज व कागदपत्र छाननी करुन आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक कार्यालयाकडे दिनांक ३० जुन, २०२१ पर्यत सादर करावयाचे आहेत.

Scanned with CamScanner

# आवेदनपत्र.

| |
|---|
| पासपोर्ट आकाराचे साक्षांकित रंगीत छायाचित्र |

प्रति,
मा. आयुक्त,
आदिवासी विकास आयुक्तालय,
आदिवासी विकास भवन, गडकरी चौक
महाराष्ट्र राज्य, नाशिक

**विषय :- अनुसूचित जमातीच्या मुला- मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणेबाबत..**

महोदय,

अनुसूचित जमातीच्या मुला- मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणेसंबंधी योजने अंतर्गत शिष्यवृत्ती मिळणेकरीता मी माझी वैयक्तीक व कुटूंबाची माहिती या अर्जाद्वारे खालीलप्रमाणे सादर करीत असुन मला शिष्यवृत्ती मंजूर करावी अशी विनंती आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी / विद्यार्थीनीचे संपुर्ण नांव<br>अ) इ-मेल | :- | ------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता | :- | ------------------------------------------<br>------------------------------------------<br>------------------------------------------ |
| | संपर्काचा दुरध्वनी क्रमांक<br>(एस.टी.डी. कोडसहीत) व मोबाईल क्र | :- | ------------------------------------------ |
| ३. | अ) विद्यार्थ्याची जात | :- | ------------------------------------------ |
| | ब) पोटजात ( सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र/वैधता प्रमाणपत्रासह ) | :- | ------------------------------------------ |
| ४. | अ) विद्यार्थ्याची जन्मतारीख ( जन्मतारीख दर्शविणारे कागदपत्र सोबत जोडावे) | :- | अंकामध्ये ------------------------------<br>अक्षरी ------------------------------ |
| ५. | अ) विद्यार्थ्याचे पालकाचे संपुर्ण नांव | :- | ------------------------------------------ |
| | ब) निवासस्थानाचा पुर्ण पत्ता | :- | ------------------------------------------<br>------------------------------------------ |
| | क) संपर्काचा दुरध्वनी क्रमांक<br>एस.टी.डी.कोडसह) व मोबाईल क्रमांक | :- | ------------------------------------------ |
| | ड) इ-मेल पत्ता (असल्यास) | :- | ------------------------------------------ |
| ६. | अ) विद्यार्थ्याचे पालकाचा धंदा / व्यवसाय / नोकरी करीत असल्यास शासकीय /निमशासकीय खाजगी उपक्रमातील हुद्या/ पदनाम | :- | ------------------------------------------ |
| | ब) कार्यालयाचा पत्ता | :- | ------------------------------------------<br>------------------------------------------ |

Scanned with CamScanner

क) संपर्काचा दुरध्वनी क्रमांक एस.टी.डी.कोडसह) :- ----------------------------------------

ड) इ-मेल पत्ता :- ----------------------------------------

७. कुटूंबातील सर्व व्यक्तींचे मागील वर्षातील सर्व मार्गानी मिळणारे एकुण वार्षीक उत्पन्न ( सोबत उत्पन्नासबंधी सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रम्प्रणपत्र जोडावे) :- रुपये ----------------------------

८. विद्यार्थ्याची शैक्षणिक पात्रता (इयत्ता १२ वी व त्यापुढील ) :- माहिती खालील प्रमाणे -

| | परीक्षेचे नांव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | परीक्षा मंडळ / विद्यापीठाचे नांव | प्राप्त केलेले गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | बारावी - | | | | |
| २ | पदवी - | | | | |
| ३ | पदव्युत्तर – | | | | |

९. विद्यार्थ्याचे कुटूंबाचा तपशिल -

| अ. क्र. | संपुर्ण नांव | वय | विद्यार्थ्याशी असलेले नाते | व्यवसाय | एकुण वार्षीक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१०) विद्यार्थ्याने परदेशात प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव :- ----------------------------------------

११) सदर अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी :- ----------------------------------------

१२) (अ) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या परदेशातील विद्यापीठाचे नांव : ----------------------------------------

विदेशातील शिक्षण संस्थेचे नांव (वेबसाईटसह) :- ----------------------------------------

(ब) विद्यापीठ/संस्थेचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :- ----------------------------------------

(क) संपर्काचा दुरध्वनी क्रमांक (एसटीडी कोडसह) :- ----------------------------------------

(ड) इ-मेल पत्ता (संस्थेचा इ-मेल आयडी ) :- ----------------------------------------

| अ. क्र. | विद्यार्थ्याने परदेशातील प्रस्तुत अभ्यासक्रमासाठी भरलेल्या / भरावयाच्या फीसबंधी तपशिल | एक वर्षाचा खर्च | | संपुर्ण अभ्यासक्रमाचा खर्च | |
|---|---|---|---|---|---|
| | | विदेशी चलनात | भारतीय चलनात | विदेशी चलनात | भारतीय चलनात |
| १ | शिक्षण फी (टयुशन फी) | | | | |
| २ | परीक्षा फी (एक्झाम फी) | | | | |
| ३ | निवास व भोजन खर्च (निर्वाह भत्ता) | | | | |
| ४ | पुस्तके व इतर साहित्य खर्च | | | | |
| | एकूण खर्च | | | | |

| | |
|---|---|
| इ) विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्तीची मंजूर रक्कम (टयुशन फी) ऑनलाईन प्रणालीनुसार जमा करणेसाठी विद्यापीठ/ संस्थेचे नांव, बँकेचे नांव, पत्ता, खाते क्रमांक किंवा, स्विफट करावयाचे आहे त्याचे नांव . | अ) बँकेचे नांव ----------------------------<br>ब) शाखा व पत्ता ----------------------------<br>क) खाते क्रमांक ---------------------------- |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| | ड) सॉर्ट कोड नंबर ----------------------------------<br>इ) स्विफट कोड नंबर ------------------------------<br>फ) आय. बी. पी. एन. क्रमांक ---------------------- |
| फ) विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्तीची मंजूर रक्कम (निर्वाह भत्ता) ऑनलाईन प्रणालीनुसार जमा करणेसाठी बँकेचे नांव, पत्ता, खाते क्रमांक किंवा, स्विफट करावयाचे आहे त्याचे नांव . | अ) बँकेचे नांव ------------------------------------<br>ब) शाखा व पत्ता ---------------------------------<br>क) खाते क्रमांक ---------------------------------<br>ड) सॉर्ट कोड नंबर -------------------------------<br>इ) स्विफट कोड नंबर ----------------------------<br>फ) आय. बी. पी. एन. क्रमांक -------------------- |
| ज) विद्यार्थ्याला सदर अभ्यासक्रमासाठी आणखी काही शिष्यवृत्ती मंजूर असल्यास त्यासबंधी तपशिल | ------------------------------------------------ |

आम्ही असे जाहिर करतो की, वर सादर केलेली सर्व माहिती संपुर्णत: सत्य आहे. ही माहिती खोटी आढळल्यास अर्जदार सदर शिष्यवृत्तीस अपात्र ठरेल. तद्वतच फौजदारी कारवाईस पात्र राहील.

आम्ही असेही जाहिर करतो की, सदर शिष्यवृत्ती योजनेच्या अटी व शर्ती आम्ही पुर्णपणे वाचल्या असुन त्या आम्हाला समजल्या आहेत आणि त्या आम्हाला मान्य आहेत.

ठिकाण : -------------------- ( विद्यार्थ्याची सही -------------------------------- )

दिनांक : -------------------- ( विद्यार्थ्याचे नांव ---------------------------------)

(पालकाची सही - -------------------------------)

(पालकाचे नांव - - ---------------------------------)

अर्जासोबत विद्यार्थ्याने जोडावयाची कागदपत्र (सहपत्र) -

१) सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.

२) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र.

३) इयत्ता १२ वी आणि पदवी अभ्यासक्रमाच्या गुणपत्रीकांच्या सत्यप्रती.

४) कुटूंबातील व्यक्तींच्या वार्षिक उत्पन्नासंबंधी सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र.

५) अर्जदाराने परदेशात ज्या विद्यापिठात /मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत उच्च शिक्षण घेणेसाठी प्रत्यक्ष प्रवेश मिळाला आहे त्यासबंधीत विद्यापिठाचे/ शिक्षण संस्थेचे पत्र आणि त्या विद्यापिठाचे शैक्षणिक शुल्क आकारणीसंबंधी व इतर खर्चाची तपशिलवार माहिती / विवरण. (प्रॉस्पेक्टचे प्रतीसह)

६) ज्या देशात उच्च शिक्षणासाठी जाणार आहे त्या देशाचे पारपत्र (पासपोर्ट )

७) दोन राजपत्रित अधिका-यांचे ओळख /शिफारस पत्र.

८) विद्यार्थ्याचे वयासबंधी प्रमाणपत्र (शाळा सोडल्याचा दाखला /इयत्ता १२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्राची सत्यप्रत.

९) अभ्यासक्रम पुर्ण न केल्यास /अर्धवट सोडल्यास, बनावट कागदपत्र सादर केल्याचे निदर्शनास आल्यास शासनाने केलेला पुर्ण खर्च परत करण्यात येईल याबाबत रु.१००/- चे स्टॅंप पेपरवर हमीपत्र.

१०) अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर नोकरी मिळाल्यावर शासनाने खर्च केलेल्या रक्कमेपैकी स्वेच्छेने कमीत कमी १० टक्के रक्कम शासनामार्फत स्थापन करण्यात आलेल्या अनुसूचित निधी मध्ये (आदिवासी उपयोजना निधी ) जमा करण्याबाबत रु.१००/- स्टॅंप पेपरवर शपथपत्र.

११) परदेशी विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी TOFEL/IELTS परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र.

**/टिप :- सर्व प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांनी प्रमाणित व स्वाक्षांकित केलेल्या असाव्यात तसेच सदरचे आवेदनपत्र परिपुर्ण भरणे आवश्यक आहे.**

----------oo------------

Scanned with CamScanner

(हमीपत्र नमुना)

मी. ------------------------------------ वय ------- व्यवसाय --------------- रा. ----------------------- ----------- हमीपत्र लिहून देत आहे की, महाराष्ट्र शासनाकडून द्वारा मा.आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचेकडून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळणा-या शिष्यवृत्तीसाठी मी पात्र ठरल्यास व मी निवडलेला अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास, तसेच शिष्यवृत्तीसाठी बनावट कागदपत्र सादर केल्याचे आपले निदर्शनास आल्यास माझे अभ्यासक्रमासाठी शासनामार्फत खर्च करण्यात आलेली संपुर्ण रक्कम माझ्याकडून व्याजासह वसुल करण्यात येईल. सदर अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर भारतामध्ये परत येणे किंवा भारतात किमान पाच वर्ष सेवा करणे मला बंधनकारक राहील. या अटी मला मान्य आहेत.

ठिकाण -

दिनांक - / /२०२१

( )

हमीपत्र लिहून देणार यांची स्वाक्षरी

Scanned with CamScanner